Printing Area
UGC
Jr.No.43053
UGC Approved Referred Journal

ISSN 2394-5303

Issue-38, Vol-01, February 2018

# Printing Area®

## International Multilingual Research Journal

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor
Dr.Bapu G.Gholap

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research journal | Febuary 2018 Issue-38, Vol-01 | 0106

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

24

# 'अस्मितादर्श' मधील निग्रो साहित्यविषयक लेख

प्रा.सर्जेराव रणखांब
(मराठी विभाग)
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**********

अस्मितादर्शमधून निग्रो साहित्याचे स्वरुप स्पष्ट करणारे लेखही प्रसिध्द झालेले आहेत. निग्रो साहित्य आणि दलित साहित्य यांचे जवळचे नाते आहे. दलित साहित्याबरोबरच अस्मितादर्शमधून निग्रो साहित्याचा विचार त्यामुळेच करण्यात आलेला आहे. कारण निग्रो आणि दलित लेखक आपल्या 'अस्मिते' चा शोध घेत आहेत. निग्रो व दलित साहित्यातील अनुभव हा विषमतेवर आधारलेल्या समाजजीवनातून आला आहे; सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून दोघेही लिहीत आहेत. आणि या दोन्ही वाङ्मयाची भाषा सांस्कृतिक बंडाची व नव्या सांस्कृतिक मूल्यांचा शोध घेण्याची आहे. या प्रेरणेमुळेच अस्मितादर्शमधील निग्रो साहित्यविषयक लेख भारतातील दलित साहित्याच्या संदर्भात महत्वाची आहेत. किंबहुना दलित साहित्याला नवा वैचारिक दृष्टिकोन देणारे हे लेख आहेत.

डॉ.म.ना.वानखेडे व डॉ.जनार्दन वाघमारे यांनी या साहित्याचा प्रामुख्याने विचार केलेला आहे. या दोहोंचेच लेख अस्मितादर्शमध्ये आहेत. अमेरिकन निग्रो वाङ्मयाचे स्वरूप, नियतीशी झुंजणारा निग्रो लेखक-जेम्स बॉल्डविन व निग्रोसाहित्य आणि दलित साहित्य, असे स्थूलमानाने या लेखांचे स्वरूप आहे.

अमेरिकेच्या दक्षिण भागात निग्रो फार मोठ्या प्रमाणावर होते. गुलाम म्हणून त्यांना आफ्रिकेतून आयात केले जात असे. म्हणून ते मूळचे अमेरिकन नाहीत. युरोपच्या वेगवेगळ्या विभागातील लोकांनी अमेरिकेत येऊन आपल्या वसाहती स्थापिलेल्या स्वतंत्र व संपन्न अशा जीवनाच्या शोधात हे लोक अमेरिकन आले होते. परंतु निग्रो हे स्वातंत्र्य संपत्तीच्या शोधात अमेरिकेत आले नव्हते. त्यांना जबरदस्तीने तेथे नेण्यात आले होते. अमेरिकेने त्याच्या बदल्यात निग्रोंना भयंकर गुलामी व प्रचंड दारिद्र्य दिले. 'आपली भाषा आपली संस्कृती, आपला इतिहास आणि एकंदर आपला आफ्रिकन वंशिक वारसा त्याला सोडावा लागला'.

त्यामुळे त्याच्याजवळ त्याच्या देशाचे शरीर आणि मन या दोनच गोष्टी शिल्लक होत्या. श्वेतांच्या धर्म आणि संस्कृतीने त्यांना बरोबरीची वागणूक दिली नाही. त्यांच्यावर बहिष्कार टाकला, त्यांना घाणेरडी कामे करावयास लावली. म्हणूनच 'अमेरिकन संस्कृतीने त्याला समाजाच्या तळातील 'PLACE' दिली. ती 'PLACE', त्याला इच्छा असूनही सोडता आली नाही'. असे उल्लेख या लेखात आढळतात.

जीवनामध्ये ज्या वेळेस साचलेपण येते त्यावेळेस हा साचलेपण दूर करण्यासाठी काही नवीन विचार अस्तित्वात येत असतात. निग्रोने अमेरिकेत या विचाराद्वारेच सामाजिक आणि सांस्कृतिक लढा उभा केला. त्यामध्ये निग्रो साहित्याचे कार्यही आहे. निग्रोंचे जीवन त्यांच्या वाङ्मयामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात चित्रित झालेले आहे. कविता, कथा, कादंबरी अशा वाङ्मय प्रकारातून आपल्या जीवनाला अस्मिता प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून झालेला आहे. म्हणून त्यांच्याविषयी आपल्या लेखात जनार्दन वाघमारे म्हणतात, 'निग्रो कविता अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात जन्मली. दोनशे वर्षांच्या उन्हापावसात आणि वाऱ्या वादळात ती वाढली आहे. निग्रोंचे लोकवाङ्मय तर फारच जूने आणि समृध्द आहे. संगीताच्या बाबतीत तर त्यांची बरोबरी श्वेतांना करता आलेली नाही'.

निग्रोंनी आपली वाङ्मयनिर्मिती करण्याच्या अगोदर श्वेतांनी त्यांचे जीवन आपल्या वाङ्मयात आणण्याचा प्रयत्न केला. परंतू पुष्कळदा त्यांनी आपल्या वाङ्मयातून निग्रोंचे जीवन विकृत पध्दतीने आणलेले आहे. अमेरिकन निग्रो साहित्याने खरी प्रगती पहिल्या महायुध्दानंतर केली. १९२० ते १९३० या काळात कलासक्त निग्रो

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY, DEGLOOR COLLEGE, DEGLOOR, Dist.Nanded

मनाने त्यांच्या समजजीवनात समाजप्रबोधनाची खरी लाट या काळातच निर्माण झाली होती.

अमेरिकन निग्रो वाड्मयाच्या प्रारंभाची पार्श्वभूमी सांगताना डॉ.जनार्दन वाघमारे (निग्रो वाड्मय व दलित वाड्मय) या लेखात लिहितात, '१९४० मध्ये रिचर्ड रॉईटची Native Son ही कादंबरी प्रकाशित झाली. शिकागोच्या घेट्टो जीवनावरील या कादंबरीने रिचर्ड राईटला अमेरिकेचा डॉस्टोव्हस्की बनवले. या कादंबरीतील विद्रोही निग्रो नायकाने अमेरिकन संस्कृतीला फार मोठा धक्का दिला. निग्रोच्या विद्रोही साहित्याची सुरुवात खऱ्या अर्थाने या कादंबरीपासून होते'.

यात पुढे स्पष्टीकरण देत-देत १९५२ सालची राल्फ एलिसनची 'Invisicle Man' ही कादंबरीने निग्रो जीवनातील तीन शतकाचा अंधार प्रकाशात आणला आहे. जेम्स बाल्डविन, लॉरेन हॅसवटी इत्यादी निग्रो कलावंताचे वाड्मयीन यश आपल्या लेखातून प्रस्तुत लेखकाने निदर्शीले आहे.

अमेरिकन निग्रो लेखकांच्या संदर्भात 'निग्रो वाड्मय' या लेखात म.ना.वानखेडे यांनीही सविस्तर चर्चा केलेली आहे. निग्रो लेखकांच्या साहित्याचा वेध घेऊन त्यांची जीवनविषयक परियच या लेखातून करुन दिला आहे. अमेरिकन समाजाच्या नितिमत्तेचा एक भाग काळा व गोरा या भेदावर आधारलेला आहे. गोऱ्या लेखकाला या प्रश्नाकडे तिऱ्हाईतासारखे बघता येईल. परंतु निग्रो लेखकाला आपल्या सामाजिक दु:खाच्या कथेतून बाहेर पडणे कठीण आहे. कारण अनुभव त्या दुखावरच आधारलेला असतो. म्हणूनच हे वाड्मय जिवंत व विद्रोही असे ठरलेले आहे. जोपर्यंत अमेरिकेतील काळ्या व गोऱ्या समाजातील सांस्कृतिक संघर्ष नाहिसा होत नाही. तोपर्यंत हे वाड्मयच विरोधीच राहणार, असे या लेखातून प्रस्तुत लेखकाने सूचीत केले आहे.

**नियतीशी झुंजणारा निग्रो लेखक : जेम्स बॉल्डविन :-**

निग्रो लेखक जेम्स बॉल्डविन यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्वाचा शोध डॉ.जनार्दन वाघमारे यांनी घेतलेला आहे. (अस्मितादर्श-मार्च-६९). अमेरिक निग्रो साहित्याच्या इतिहासात प्रामुख्याने रिचर्ड राईट, राल्फ एलितम व जेम्स बॉल्डविन यांना महत्वाचे स्थान आहे. रिचर्ड राईटने १९४० साली 'Native Son' ही कादंबरी प्रसिध्द करुन निग्रो समाजाला नवी दृष्टी दिली. रिचर्डच्या अगोदर श्रीमती स्टोव यांची 'Uncle Tom's Cadin' (५२) ही निग्रो जीवनावरची कादंबरी प्रसिध्द झाली होती. पण तिने निर्माण केलेल्या निग्रो हा अन्याय सोसणारा गुलामीचा प्रतिकार न करणारा होता; पण रिचर्ड राईटने या प्रतिमेच्या जागी दुसरी प्रतिमा निर्माण केली. 'मानवी मन हरवून बसलेला आणि ज्याचे एकंदर मनच बेचिराख झाले आहे, असा नवीन निग्रो निर्माण केला'. एका आक्रमक पावित्र्यात उभे राहून निग्रोवर झालेल्या अनन्वित छळांची, भयंकर अत्याचाराची कहाणी त्यांनी सांगितली. आणि अमेरिकन निग्रो-साहित्याचा इतिहास 'राईट युगा' चा कालखंड अस्तित्वात आला.

जेम्स बॉल्डविन हा देखील 'राईटवादी' लेखक होय. हा राईटचा मानसपुत्र होता. पण अधिक काळापर्यंत राईटचा प्रभाव त्याच्यावर टिकू शकला नाही. साहित्य हे एक शस्त्र आहे ही राईटच्या युगाची कल्पना जेम्स बॉल्डविनने मान्य केले नाही उलट 'वास्तविक साहित्य म्हणजे समाजशास्त्र नाही साहित्याचा उपयोग सामाजिक अभिसरनासाठी करावयाचा नसतो. साहित्याला समाजसुधारकांची भूमिका घेऊन समाजाचे प्रश्न सोडवायचे नसतात. त्याला जीवनाचे करावयाचे असते. कलात्मक सृजन'. अशी भूमिका बॉल्डवीनने घेतली.

अमेरिकन जीवनातील मुख्य प्रवाहाशी एकरुप होऊन त्याला साहित्याची निर्मिती करावयाची होती. आपण निग्रोही आहोत आणि अमेरिकनसुध्दा आहोत ही दुहेरी जाणीव निग्रोंच्या ठिकाणी होती. या दुभंगलेल्या जीवनाचा अर्थ लावण्याची जबाबदारी जेम्स बॉल्डवीनने घेतली म्हणून या लेखात जनार्दन वाघमारे म्हणतात, 'जेम्स बॉल्डविन हा निग्रोचा 'आवाज' तर आहेच, पण अमेरिकेचा भाष्यकारदेखील आहे'. निग्रो प्रश्न तर बॉल्डवीनच्या सर्वच पुस्तकाचा आहे. त्याचे लिखाण वाचताना उघडी वीजवाहिका हातात धरल्यासारखा अनुभव येतो. म्हणून समाजाच्याच काय पण नियतीच्याच विरुध्द त्याने बंड

पुकारले होते. असे जेव्हा बॉल्डविनबद्दल डॉ.वाघमारे यांनी म्हटले आहे.

जनार्दन वाघमारे यांचा हा लेख जेम्स बॉल्डवीनच्या व्यक्तिमत्वाच्या कंगोऱ्याचा वेध घेणारा आहे. या लेखाची भाषा वाचकांना बांधून ठेवणारी आहे. निग्रोंच्या छळांची त्यांच्या वाचकांनी जाणीव करून देणारी आहे. 'निग्रोच्या अस्मितेचा शोध'. ब्लॅक पॉवर हा लेखसुध्दा निग्रो चळवळीची ओळख करुन देणारा आहे. ही चळवळ आहे का? विचारसरणी? का संघटना आहे? असे अनेक प्रश्न या 'ब्लॅक पॉवरनें' निर्माण केलेले होतं. म्हणून श्वेत अमेरिकेच्या मनात निग्रोविषयी खूप असा गैरसमज निर्माण करण्या ही काळी शक्ती कारणीभूत ठरलेली आहे. तसेच काही समजदार व जबाबदार निग्रोंच्या मनात ह्या चळवळींमुळे वैचारिक गोंधळ व मानसिक अस्वस्थता निर्माण झाली होती. असे या लेखातून जनार्दन वाघमारे यांनी सूचीत केले आहे. खुद्द डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांनाही ही चळवळ मान्य नव्हती, असे सांगितले आहे.

या लेखातून खालील गोष्टी अधोरेखित झालेल्या दिसतात.

१) ब्लॅक पॉवरला निग्रो तरुणांची ध्येयवादी संघटना निर्माण करावयाची होती.

२) अमेरिकेत राहून आपली एक उप-संस्कृती निर्माण केल्याशिवाय आपल्याला किंमत मिळणार नाही, असे त्यांना वाटते.

३) निग्रोंना आक्रमक व लढाऊ बनविणे हा मुख्य पर्याय या चळवळीसमोर आहे.

४) इतिहास-निर्मितीच्या कार्यात निग्रोंना सिंहाचा वाटा मिळाल्याशिवाय त्यांना आपली अस्मिता निर्माण करता येणार नाही. असे ब्लॅक पॉवर ला वाटते.

५) स्टोकले कारमायकेल आणि चार्लस हॅमिल्टन यांनी Black Power नावाचे पुस्तक लिहून या The Politics of Liceration in America. चळवळीच्या तत्वज्ञानाची रुपरेषा जगासमोर सादर केली. त्यात निग्रोंना स्वत:चे सांस्कृतिक मूल्ये निर्माण केली पाहिजेत, आदी तत्वांचा समावेश आहे.

६) 'अरे श्वेत्त समाजा, तुला आता बंदुकीच्या गोळीनेच उत्तर दिले पाहिजे! तुला बंदुकीचीच भाषा समजू शकते!' हे ब्लॅक पॉवरचा प्रवक्ता कारमायकेल याची आरोळी होती.

संदर्भ:-


१) वाघमारे जनार्दन-निग्रो वाङ्मय व दलित वाङ्मय-अस्मितादर्श जाफिया-७४, अंक-१, पृ.४१

२) तत्रैव-निग्रो वाङ्मय व दलित वाङ्मय-अस्मितादर्श जाफेमा-७४, अंक-१, पृ.४५

३) तत्रैव-निग्रो वाङ्मय व दलित वाङ्मय-अस्मितादर्श जाफेमा -७४, अंक-१, पृ.४३

४) तत्रैव-निग्रो वाङ्मय व दलित वाङ्मय-अस्मितादर्श जाफेमा -७४, अंक-१, पृ.४५

५) तत्रैव-नियतीशी झुंजणारा निग्रो लेखक : डॉ.बॉल्डवीन (मार्च ६९) अंक-१, पृ.२२

६) तत्रैव-नियतीशी झुंजणारा निग्रो लेखक : डॉ.बॉल्डवीन (मार्च ६९) अंक-१, पृ.२२

७) तत्रैव-नियतीशी झुंजणारा निग्रो लेखक : डॉ.बॉल्डवीन (मार्च ६९) अंक-१, पृ.२३


❑❑❑

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका
प्रिंटिंग एरिया
Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded